पुढारी दि. 23/12/2022

# अपहृत बालक १२ दिवसांनी आईच्या कुशीत!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**पुणे रेल्वे स्थानकावरून शनिवारी (दि. ११) अपहरण झालेल्या अडीच वर्षांच्या बालकाचा बारा दिवसांनंतर शोध लागला आहे. लोहमार्ग पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या पथकाने या बालकाला शोधले. गुरुवारी (दि. २२) सायंकाळच्या सुमारास पोलिसांना अपहृत बालक आणि आरोपी रांजणगाव परिसरात सापडले. मूलबाळ होत नसल्याने दाम्पत्याने बालकाचे अपहरण केल्याचे तपासात समोर आले आहे.**



लोहमार्ग पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या पथकाने अडीच वर्षांच्या अपहृत बालकाला सुपूर्द केले. त्या वेळी कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला.

- मूल होत नसल्याने केले होते अपहरण
- 'पुढारी'ने सर्वप्रथम दिली होती बातमी
- रेल्वे लोहमार्ग पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या पथकाची कामगिरी

पुण्यात उदरनिर्वाहासाठी आलेले दाम्पत्य त्यांच्या मूळगावी झारखंड येथे जाण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकावर आले होते. या दाम्पत्याबरोबर त्यांचा अडीच वर्षांचा चिमुरडाही होता. त्यावेळी प्लॅटफॉर्म क्रमांक १ जवळील सरकत्या जिन्यालगत रात्री साडेआठच्या सुमारास एक महिला व पुरुष त्यांच्याजवळ आले. त्यांच्याशी गप्पा मारू लागले. महिलेने तिच्याजवळील खाऊ मुलाला खाण्यास दिला. यादरम्यान मुलाबद्दल जिव्हाळा आहे, असे दाखवून ते दोघे त्या बाळाला खाऊ आणतो म्हणून घेऊन गेले. आणि पुन्हा परतलेच नव्हते. याबाबत रेल्वे पोलिसांना तक्रार मिळाल्यावर लोहमार्ग पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला. तब्बल १२ दिवसानंतर हा मुलगा पोलिसांना सापडला आहे. पोलिसांनी रांजणगाव परिसरातून आरोपींच्या मुसक्या आवळल्या. विजय अनंत जयस्वाल आणि सुमन शर्मा अशी आरोपींची नावे आहेत. दरम्यान, दै. 'पुढारी'ने याबाबतची बातमी सर्वप्रथम दिली होती.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वी आरोपी दाम्पत्याचे लग्न झाले. मात्र, त्यांना मूलबाळं होत नव्हते. त्यामुळे या आरोपींनी पुणे रेल्वे स्थानकातून या बालकाचे अपहरण केले होते. भूपेश भुवन पटेल (वय २ वर्षे ११ महिने) असे अपहरण झालेल्या बालकाचे नाव असून, ते मेडपार बाजार, जिल्हा- बिलासपूर, हेरी, छत्तीसगढ येथील आहे.

लोहमार्ग पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर अधीक्षक गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद खोपीकर, इरफान शेख, सहायक निरीक्षक बाळासाहेब अंतरकर, पालवी काळे, आरपीएफचे निरीक्षक बी. एस. रघुवंशी, आरपीएफचे कर्मचारी युवराज गायकवाड, विशाल माने, लोहमार्ग पोलिसांचे कर्मचारी नीलेश बिडकर, धीरज भोसले, सुनील कदम, अनिल दांगड, विक्रम मते यांच्या पथकाने ही कामगिरी केली.